**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दिल्लीत विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी
- महाराष्ट्रात चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये वार्षिक सरासरीच्या सुमारे ९५ टक्के परदेशी गुंतवणूक
- क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना सर्वत्र आदरांजली
- संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे अस्थायी सदस्य म्हणून डेन्मार्क, ग्रीस , पाकिस्तान, पनामा आणि सोमालिया या देशांचा दोन वर्षांचा कार्यकाळ सुरु

  **आणि**
- बॉर्डर- गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या अखेरच्या सामन्यात भारताचा पहिला डाव १८५ धावांमधे आटोपला

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दिल्लीत विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली. जेजे क्लस्टर्समध्ये राहणाऱ्यांसाठी नव्यानं बांधण्यात आलेल्या जवळपास सतराशे सदनिकांचं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं, तसंच राष्ट्रीय राजधानीच्या अशोक विहार भागातील पात्र लाभार्थींना या घरांच्या चाव्याही सुपूर्द केल्या. कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्र्यांनी झोपडीवासियांसाठी बांधलेल्या नव्या सदनिकांची पाहणी केली तसंच स्थानिकांशी संवाद साधला. दिल्ली विद्यापीठाच्या जवळपास सहाशे कोटी रुपये खर्चाच्या तीन प्रकल्पांची पायाभरणी प्रधानमंत्री मोदी यांनी केली तसंच नजफगडच्या रोशनपुरा भागात वीर

सावरकर महाविद्यालयाची कोनशिलाही त्यांच्या हस्ते बसविण्यात आली, तसंच केंद्रीय शिक्षण मंडळाच्या नवीन विस्तारित परिसराचं लोकार्पण त्यांनी केलं. केंद्रीय गृहनिर्माण आणि नगरविकास मंत्री मनोहर लाल यांचंही भाषण यावेळी झालं.

<><><><><>

आसाममधील विविध विकास प्रकल्पांच उद्घाटन आज गुवाहाटी इथ केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी गुवाहाटी- न्यू लखीमपुर जनशताब्दी एक्सप्रेससह तीन रेल्वे गाड्यांना ते हिरवा झेंडा दाखवतील. तसंच एका रेल्वेपुलाचं उद्घाटन करतील. कोकराझार आकाशवाणी केंद्राच्या १० किलोवॅट प्रक्षेपकाच आणि राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण संस्थेच उद्घाटनही मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं गुवाहाटी इथून होणार आहे. नंतर मॉरिगऑन जिल्ह्यातल्या जगीरोड इथ उभारण्यात आलेल्या टाटा सेमी कंडक्टर कारखान्याला अश्विनी वैष्णव भेट देणार आहेत.

<><><><><>

परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र सातत्याने अग्रेसर राहिला असून चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये राज्यात वार्षिक सरासरीच्या सुमारे ९५ टक्के गुंतवणूक आली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीच्या आकडेवारीत ही बाब स्पष्ट झाल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्स या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

या कालावधीत १ लाख १३ हजार २३६ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक राज्यात झाली. हे प्रमाण गेल्या चार वर्षातल्या सरासरीच्या ९४ पूर्णांक ७१ शतांश टक्के आहे.

महाराष्ट्र आता थांबणार नाही, ही घौडदौड अशीच कायम राहील, अशी ग्वाहीदेखील मुख्यमंत्र्यांनी दिली आहे.

**<><><><><>**

स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांची आज जयंती. या निमित्तानं त्यांना सर्वत्र आदरांजली वाहण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह इतर मान्यवरांनी सावित्रीबाईंच्या योगदानाचं स्मरण केलं आहे.

**होल्ड--व्हाईस कास्ट..**

*( सावित्रीबाई फुले या स्त्री सक्षमीकरणाच्या जनक होत्या. शैक्षणिक, सामाजिक सुधारणा क्षेत्रातल्या त्या प्रणेत्या होत्या, असे गौरवोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या संदेशात काढले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईतल्या त्यांच्या वर्षा शासकीय निवासस्थानी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या संदेशात स्त्रीशिक्षणासाठी, प्लेगपीडितांसाठी सावित्रीबाईंनी केलेल्या कार्याचं स्मरण केलं आहे आणि सर्व महिलांना महिला शिक्षण दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही समाजमाध्यमावरच्या संदेशात सावित्रीबाई फुले यांना आदरांजली वाहिली आहे.*

*काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचं स्मरण केलं आहे. सावित्रीबाईंनी महिला शिक्षणाचे दरवाजे उघडले,*

*तसंच समाजातल्या वंचित, पीडित आणि शोषित घटकांच्या हक्कांसाठी जोरदार लढा दिला, असं खरगे यांनी म्हटलं आहे. )*

**<><><><><>**

केंद्रीय गृहविभागाचे माजी सचिव अजयकुमार भल्ला यांनी आज मणिपूरचे राज्यपाल म्हणून शपथ घेतली. मणिपूर उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश सिद्धार्थ मृदुल यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. मणिपूरचे मुख्यमंत्री एन बीरेन सिंग, विधानसभा अध्यक्ष, मंत्रिमंडळ सदस्य आणि इतर आमदार शपथविधी कार्यक्रमाला उपस्थित होते. भल्ला भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९८४ च्या तुकडीतले आधिकारी होते.

**<><><><><>**

ओदिशाचे राज्यपाल म्हणून डॉ. हरी बाबू कंभमपाटी यांनी आज शपथ घेतली. ओदिशा उच्च न्यायलयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती चारधारी शरण  सिंग यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. कंभमपाटी यापूर्वी मिझोरमचे राज्यपाल होते.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे अस्थायी सदस्य म्हणून डेन्मार्क, ग्रीस , पाकिस्तान, पनामा आणि सोमालिया या देशांचा दोन वर्षांचा कार्यकाळ कालपासून सुरु झाला. या पाच देशांच्या जबाबदारीचं प्रतीक म्हणून त्यांचे ध्वज रोवण्याचा कार्यक्रम काल सुरक्षा परिषदेच्या न्यूयॉर्क इथल्या मुख्यालयात झाला. इक्वाडोर, जपान, माल्टा, मोझाम्बिक आणि स्वित्झरलँड यांची जागा या देशांनी घेतली आहे.

**<><><><><>**

केंद्रीय अन्वेषण संस्था सीबीआयच्या  उप अधीक्षकासह अन्य काही जणांविरुद्ध लाच मागितल्याचा आणि विविध बँक खात्यांच्या तसंच हवालाच्या माध्यमातून ती स्वीकारल्याबद्दल गुन्हा नोंदवला आहे. सीबीआयच्या बँक सिक्युरिटीज आणि अपहार शाखेचे अधीक्षक बी. एम. मीना यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदविण्यात आला असल्याचं सीबीआयच्या अधिकृत निवेदनात म्हटलं आहे. हा गुन्हा नोंदवण्यात आल्यानंतर जयपूर, कोलकाता, मुंबई आणि नवी दिल्लीत २० ठिकाणी छापे टाकण्यात आले त्यामध्ये ५५ लाख रुपयांची रोख रक्कम, मालमत्तेची कागदपत्रं हस्तगत करण्यात आल्याचंही निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशाच्या उत्तर भागात दाट धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्यानं रेल्वे आणि विमानांच्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे. नवी दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर आज सकाळी सुमारे ५० उड्डाणांना विलंब झाला. तसंच दिल्लीला जाणाऱ्या २४ रेल्वेगाड्या पाच तास विलंबानं धावत आहेत, असं रेल्वेनं सांगितलं.

**<><><><><>**

बॉर्डर गावस्कर चषक भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया क्रिकेट कसोटी मालिकेत सिडनी इथं सुरू असलेल्या अखेरच्या सामन्यात भारताचा पहिल्या डाव १८५ धावांवर आटोपला. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऋषभ पंत ने सर्वाधिक ४० धावा केल्या तर रवींद्र जाडेजा ने २६ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या बोलांड ने ३१ धावात ४ गडी बाद केले. ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव सुरु झाला असून दिवसअखेर १ बाद ९ धावा झाल्या आहेत.

**<><><><><>**

मुंबई उच्च न्यायालयानं २०१५ च्या गोविंद पानसरे हत्याकांड प्रकरणाच्या तपासावरील देखरेख थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकरणातल्या दोन फरार आरोपींना शोधून काढण्याचं मुख्य काम आता उरलं आहे, असं न्यायमूर्ती ए एस गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाटा यांच्या खंडपीठानं काल सांगितलं. तपास यंत्रणेवरील सततच्या देखरेखीविरोधातली याचिका त्यांनी निकाली काढली. मात्र या प्रकरणातली सुनावणी दैनंदिन तत्वावर घेण्याचे निर्देश खंडपीठानं खालच्या न्यायालयाला दिले.

पानसरे हत्याकांडाचा तपास सुरुवातीला गुन्हे शाखेच्या विशेष तपास पथकाकडे होता, त्यानंतर ऑगस्ट २०२२ मध्ये उच्च न्यायालयाच्या आदेशावरून तो दहशतवाद विरोधी पथकाकडे सोपवण्यात आला.

**<><><><><>**

मुंबई-गोवा महामार्गावर आज झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले. वीर रेल्वे स्थानकाजवळ एका टोइंग वाहनानं रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कारला जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला. ज्यामुळे कारमधले तीन जण जागीच ठार झाले तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.